शैक्षणिक संदर्भ अंक १२५ ऑगस्ट-सप्टेंबर २०२०


# शिक्षणात कलेचं स्थान

लेखक-नंदलाल बसु          अनुवाद - यशश्री पुणेकर

# शिक्षणात कलेचं स्थान

**लेखक-नंदलाल बसु        अनुवाद - यशश्री पुणेकर**

*'कला शिक्षणाचा उद्देश फक्त कलाकार निर्माण करणं नाही तर कलेचा बोध आणि कलात्मक व्यवहार*



*विकसित करणं हा आहे. यासाठी वेगळ्या कला विषयाची गरज नाही तर प्रत्येक विषयाच्या शिक्षणात, शाळेच्या दैनंदिन कामकाजात, वार्षिक कार्यक्रमांमध्ये कलात्मकता समाविष्ट करणं अधिक योग्य ठरेल.' स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळेला जेव्हा भारतात नव्या शिक्षणाचा पाया घातला जात होता तेव्हा मांडलेले नंदलाल बसु यांचे हे विचार आजही तितकेच उपयुक्त आहेत. नंदलाल बंगाल कला स्कूलचे संस्थापक अवनीन्द्रनाथ टागोरांचे शिष्य होते आणि त्यांनी रवीन्द्रनाथांच्या आग्रहावरून शांतीनिकेतनमध्ये कला शिक्षणासाठी कलाभवनाची स्थापना केली. त्यांनी गांधीजींच्या सांगण्यानुसार कॉंग्रेसचे अधिवेशन कलात्मक बनवण्याची जबाबदारी घेतली होती. नवरचित भारतीय संविधानाची हस्तलिखित प्रत पाण्डुलिपिमध्ये सजवण्याचे काम त्यांना पंडित नेहरूंनी दिले होते. भारतीय लोककला आणि शास्त्रीय कलांवर आधारित राष्ट्रीय पण आधुनिक भारतीय कलेच्या सूत्रधारांमध्ये नंदलाल बसु अग्रणी होते. त्यांच्या म्हणण्यानुसार शाळांमध्ये कला शिक्षणाचा उद्देश कलेसंबंधी दृष्टीकोन तयार व्हावा, जीवनातल्या प्रत्येक गोष्टीत कलेचा अंतर्भाव असावा; मग ते टेबलावर वस्तू मांडणे असो की कपडे वाळत घालण्यासारखी साधी गोष्ट असो. असा कलात्मक दृष्टीकोन तयार करायला शाळा मदत करू शकतील, कशी ते बघू या.*

माणसाने आनंद आणि ज्ञान प्राप्तीसाठी ज्या गोष्टी विकसित केल्या त्यात भाषांचं स्थान महत्त्वपूर्ण आहे. साहित्य, दर्शन (तत्त्वज्ञान), विज्ञान आणि निसर्गाच्या विविध विषयांची चर्चा भाषेच्या माध्यमातूनच होत असते. साहित्य माणसाला आनंद देतं पण त्याच्या अभिव्यक्तीचं

क्षेत्र सीमित असतं. नृत्य, संगीत, शिल्प, चित्र अशा ललित कलांना अशी मर्यादा नसते. जशी साहित्याच्या अभिव्यक्तीची गुणवत्ता असते, तशीच नृत्य, संगीत आणि इतर ललित कलांचीही काही खास वैशिष्ट्य असतात. मनुष्य ज्ञानेंद्रियातून बाह्यजगातील समस्त गोष्टींचे स्थूल ज्ञान आणि त्यांची रसानुभूती यांचा अनुभव घेतो आणि तोच अनुभव आपल्या कलेतून इतर लोकांसमोर सादर करतो. शिक्षणात कलेचा अंतर्भाव केल्याने माणसाची समज आणि रसानुभूती दोन्हीचा उत्कर्ष होतो आणि त्याला कलेच्या माध्यमातून व्यक्त होण्याची पात्रता येते. ज्याप्रकारे डोळ्यांचे काम कानांनी होऊ शकत नाही तसंच चित्रकला, संगीत, नृत्य आदि कलांचे शिक्षण केवळ वाचून लिहून होत नाही, त्यासाठी प्रात्यक्षिकाची आवश्यकता असते.

जर शिक्षणाचा उद्देश सर्वांगीण विकास असेल तर शालेय पाठ्यक्रमात कलेचं स्थान इतर सैद्धांतिक विषयांच्या बरोबरीने असायला हवं. त्या दृष्टीने आपल्या देशात विश्वविद्यालयांनी शिक्षणाची जी व्यवस्था केली आहे ती पुरेशी नाही. याचं एक कारण असं आहे की आपल्याकडे कलासाधना ही फक्त व्यावसायिक कलाकारांनी करण्याची गोष्ट आहे अशी लोकांची समजूत आहे. सामान्य माणसाला याच्याशी काही देणंघेणं नसतं असंच लोकांना वाटतं. बरीचशी सुशिक्षित माणसंही स्वतःला कलेतलं काही समजत नाही हे सांगताना संकोचत नाहीत, मग इतर साधारण माणसांची तर बातच सोडा. ते तर फोटो आणि चित्र यांच्यातला फरकही ओळखू शकत नाहीत. मुलांची जपानी बाहुली पाहून 'किती श्रेष्ठ कलाकृती आहे!' असं नवल ते करत राहतात. लाल, निळे, वांगी रंगांचे सप्रेम भेटीला गुंडाळून आलेले महारद्दी कागद पाहून त्यांच्या डोळ्यांना त्रास होत नाही. खरं सांगायचं तर उलट त्यांना छानच वाटतं. सहज उपलब्ध मातीचा माठ न वापरता जास्त उपयुक्त असतात असं समजून ते टिनची डबडी वापरतात. वरवर बघता विद्येच्या क्षेत्रात देशवासीयांची

सांस्कृतिक उन्नती झाल्यासारखी वाटते, पण एखाद्या गोष्टीचा आनंद (रसानुभूती) घेण्याचं मात्र दारिद्र्य दिसून येतं. हे फार क्लेशकारक आहे. यातून मुक्त होण्याचा एक मार्ग म्हणजे सुशिक्षित समाजात कलेच्या शिक्षणाचा प्रसार, कारण हाच समाज जनसामान्यांचा आदर्श असतो.

कलेतलं सौंदर्य न उमगल्यामुळे मनुष्य केवळ कलेच्या आनंदापासून (रसानुभूति) वंचित राहतो असं नाही तर, मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्याच्या दृष्टीनेसुद्धा त्याची हानी होते. सौंदर्यदृष्टी नसल्याने लोक आपलं घर, अंगण, परिसर स्वच्छ ठेवत नाहीत. तिथे घाण, कचरा साठू देतात, शरीर आणि कपडे स्वच्छ ठेवत नाहीत, रस्त्यात, बसमध्ये, रेल्वेत कुठेही थुंकतात आणि स्वतःच्या तसंच इतरांच्या आरोग्याला धोका निर्माण करतात. अशा लोकांमुळे रोगजंतूंचा फैलाव होतो आणि समाजाचं शारीरिक आरोग्य बिघडतं. त्यांचं हे घाणेरडं वागणं बघून इतरही त्यांचं अनुकरण करू लागतात.




## कला फक्त सधन लोकांसाठीच आहे का?

आपल्या पैकी काही लोकांना कला शिक्षण हे फक्त विलासी आणि श्रीमंत लोकांची मक्तेदारी आहे असं वाटतं. त्यामुळे त्यांच्या जीवनात कलेला काही स्थानच नसतं. सौंदर्य हेच कलेचा प्राण आहे, फक्त पैशाच्या तराजूत कलाकृती तोलली जाऊ शकत नाही. गरीब संथाल आदिवासी त्याची छोटीशी मातीची झोपडी सारवून लिंपून स्वच्छ करतो, आपलं किडूक मिडूक सामानही नीट व्यवस्थित लावून ठेवतो आणि कॉलेजमध्ये शिकणारा मुलगा होस्टेलच्या मोठ्या खोलीत

आपले महागातले कपडे चोळामोळा करून कसेही फेकून देतो. गरीब संथाल माणसाची कलासक्ती त्याच्या जीवनाचा एक भाग आहे आणि श्रीमंत मुलाची कलेची संकल्पना महागड्या कपड्यांपुरती मर्यादित आहे आणि निर्जीव आहे. काही सुशिक्षित लोकांनाही आपण कलेचे आस्वादक आहोत हे दाखवण्याची सुरसुरी असते. ते कॅलेंडरवर छापलेल्या सुंदरीच्या चित्राला फ्रेम करून एखाद्या खऱ्या सुंदर चित्राच्या शेजारी लटकवताना मी स्वतः बघितलं आहे. विद्यार्थ्यांची सौंदर्यदृष्टी तर काय सांगावी.... चित्राच्या फ्रेमवर टॉवेल लटकतोय, अभ्यासाच्या टेबलावर चहाचे कप पडलेत, आरसा, कंगवा जिथे जागा मिळेल तिथे टाकलेत, आणि कोकोच्या डब्यात कागदाची फुलं खोचून ठेवलीत.... ही यांची सौंदर्यदृष्टी! पैशाचा अभाव असेल नसेल आपल्याकडे पण सौंदर्यदृष्टीचा मात्र नक्कीच अभाव आहे....

## कलेमुळे पोट भरेल का?




आणखी काही लोक तर असंही म्हणतात की या कलाबिला छंद म्हणून ठीक आहे, पण त्याने पोट भरणार आहे का? इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. ज्याप्रमाणे साहित्याचे दोन भाग आहेत –एक आनंद आणि ज्ञान प्राप्तीचा आणि दुसरा आर्थिक प्राप्तीचा; तसेच कलेचेही दोन पैलू आहेत – एक आनंद देतो तर दुसरा धनप्राप्ती देतो. चित्र, शिल्प, नृत्य, नाट्य, संगीत यांना ललित कला म्हटले जाते. या ललित कला रोजच्या धकाधकीच्या जीवनातील सुखदुःखाने गांजलेल्या आपल्या मनाला मोकळं करतात.

या कला आपल्या दैनंदिन जीवनातील वापराच्या वस्तूंना केवळ कलात्मक जादूच्या स्पर्शाने सुंदर बनवतात. आपल्याला आनंद देतात आणि अर्थार्जनाचा आधारही होतात. कलेच्या अधोगतीमुळे देशाचीही अवनती होते. म्हणजेच आवश्यकतेनुसार कलेचा उपयोग न केल्यास देशाला ही आर्थिक तोटा सहन करावा लागतो.

## कला शिक्षणाची आवश्यकता आणि प्राथमिक उद्देश

कला शिक्षणाच्या कमतरतेमुळे आपले आजचे वर्तमान जीवन तर कुरूप बनतेच आहे




पण भूतकाळातील सौंदर्यपूर्ण गोष्टींचा आस्वाद घेण्यापासूनही आपण वंचित राहू लागलो आहोत. आपली उत्तम गोष्टींची पारख करण्याची दृष्टी तयारच झाली नाहीये. याचा परिणाम म्हणजे आपल्या देशात चोहीकडे विखुरलेली चित्रकला, मूर्तीकला, स्थापत्य यातील सौंदर्य ओळखण्यासाठी आपल्याला परदेशी लोकांवर अवलंबून राहावं लागतंय. आधुनिक कलाकृतींचेही जोपर्यंत परदेशी बाजारात मूल्यांकन होत नाही तोपर्यंत आपल्याकडे त्याला किंमत, आदर मिळत नाही. ही आपल्यासाठी शरमेची गोष्ट आहे.

आता यावर काय उपाय करता येईल याचा विचार करायला हवा. कला शिक्षणासाठी पहिली गरज असते ती निसर्गाकडे, कलात्मक वस्तूंकडे श्रद्धेने बघणे, त्यांच्या सान्निध्यात राहणे आणि ज्यांना सौंदर्यदृष्टीची जाण आहे अशा लोकांशी त्याबद्दल चर्चा करून त्यातील सौंदर्य जाणून घेणे. अन्य विषयांच्या बरोबरीने कला विषयाचा अंतर्भाव

अभ्यासक्रमात करणे हे विश्वविद्यालयांचे कर्तव्य आहे. कलाविषयांना गुण ठेवले तर त्यांचे अध्ययन चांगल्या प्रकारे होईल. त्या शिक्षणाचा उपयोग विद्यार्थांची निरीक्षण शक्ती वाढण्यासाठी तर होईलच पण साहित्य, तत्त्वज्ञान, विज्ञान इत्यादी विषयातही त्यांचा दृष्टीकोन वाढण्यास मदत होईल. पदवी परीक्षा पास करून कोणी कवी होणार नाही, तसंच कलाशिक्षण घेऊनही प्रत्येक जण चांगला कलाकार होईल अशी आशा करणं चुकीचं ठरेल. पण त्यांची कलेकडे बघण्याची दृष्टी तयार होईल. त्यातील सौंदर्य जाणून घेण्याची, त्याचा आदर करण्याची वृत्ती निर्माण होईल.

## शाळांमध्ये कला शिक्षणासाठी काय करता येईल?

सर्वात प्रथम शाळेत जागोजागी, ग्रंथालयात, वर्गात, शाळेच्या वऱ्हांड्यात, मुलांच्या राहायच्या जागेत चांगली चित्र, मूर्ती आणि अन्य ललित कलांच्या उत्तम कलाकृती सजवून ठेवाव्या. प्रत्यक्ष कलाकृती नसेल तर निदान त्यांचे फोटो तरी लावून ठेवावे म्हणजे येताजाता मुलांना त्यांची बघून बघून ओळख होईल. दुसरी गोष्ट, त्या त्या विषयातील तज्ञ व्यक्तीकडून अशा कलाकृतींचे भरपूर फोटो असलेली, त्यांचा इतिहास आणि वर्णन असलेली पुस्तके लिहून घ्यावी आणि ती मुलांना सहज उपलब्ध असावी. म्हणजे मुलांना त्या कलाकृती जाणून घ्यायला मदत होईल. तिसरी गोष्ट, अधूनमधून चित्रपट किंवा माहितीपटाच्या माध्यमातून मुलांना निवडक देशीविदेशी कलाकृतींचे दर्शन घडवावे. चौथी गोष्ट, मुलांना बरोबर घेऊन शिक्षकांनी



*Cooking*, Image Courtesy: Rhythms of India Catalogue, SDMA,California, USA,2008

जवळपासच्या वस्तू संग्रहालय किंवा कलादालनाला भेट द्यावी. तिथल्या उत्तम कलाकृती आवर्जून दाखवाव्या. शाळेतून जर फुटबॉल मॅच बघायला मुलांना पाठवता येतं तर कलादालनाला का नाही?


एक गोष्ट लक्षात घ्या, एखादी चांगली कलाकृती आपल्या डोळयांनी बघून जाणून घेऊन जितकी कलेची पारख विकसित होईल तितकी शंभर भाषणांनी सुद्धा होणार नाही. चांगली चित्र, मूर्ती मुलांना लहानपणापासूनच बघायला मिळाली तर त्यांना जरी काही समजलं नाही तरी त्यांची दृष्टी तयार होईल. नंतर त्यांच्यात चांगल्या वाईट कलेचे विवेचन करण्याची पात्रता येईल आणि त्यांची सौंदर्यदृष्टी विकसित होईल.

पाचवी गोष्ट, मुलं जास्तीतजास्त निसर्गाच्या सान्निध्यात येतील, अशा तऱ्हेने प्रत्येक ऋतुमध्ये शाळेत उत्सवांचे आयोजन करायला हवे. या उत्सवांमध्ये त्या ऋतुत निर्माण होणाऱ्या फळाफुलांचे संकलन करणे, त्या ऋतूचे वर्णन करणाऱ्या साहित्य आणि काव्य रचनांचे वाचन, सादरीकरण करणे आणि जितकं शक्य असेल तितकं त्या ऋतुबद्दल मुलांना सांगणे यातून त्यांचा निसर्गाशी परिचय वाढवता येईल.

सहावी गोष्ट, निसर्गातील ऋतू उत्सव मुलांना प्रत्यक्ष दाखवणे. शरद ऋतुतली धान्याची शेतं आणि कमळं फुललेले तलाव, शिशिरातली पानगळ, वसंत ऋतुमध्ये येणारी कोवळी पालवी, ग्रीष्मात फुललेला पळस, बहावा हे सगळं त्यांनी अनुभवावं, याची व्यवस्था करायला हवी. विशेषतः शहरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा अनुभव गरजेचा आहे. गावातल्या मुलांची दृष्टी या गोष्टींकडे वळवायला हवी. अशा ऋतुंमध्ये शाळांना सुट्टी देऊन वनभोजनाचे आणि सहलींचे आयोजन करावे. ऋतूनुसार पोशाख आणि खेळांची मजा घेता यावी. निसर्गाची एकदा गोडी लागली, प्रेम निर्माण झालं की मुलांच्या मनातला रसप्रवाह

कधीच सुकणार नाही, कारण निसर्ग युगानुयुगे कलाकारांना कलेसाठी प्रेरणा देत आला आहे.

शेवटची गोष्ट, शाळेत दरवर्षी मुलांनी केलेल्या कलाकृतींचं प्रदर्शन भरवावं. यात प्रत्येक मुलाने एखादी तरी वस्तू अगदी मनापासून बनवून आणावी- मग ती अगदी साधी का असेना ! मुलांनी या वस्तू प्रदर्शनाला दान म्हणून देऊन टाकाव्या. त्या जशा असतील तशा शाळेने त्या स्वीकाराव्या. संगीत, नृत्य, शोभायात्रा अशा कलाप्रदर्शनातून या उत्सवाला अधिक शोभिवंत करता येईल. उत्सवासाठी कोणताही एखादा कालावधी ठरवणे कठीण आहे, कारण देश प्रांतानुसार तो वेगवेगळा असेल.



माझ्या माहितीप्रमाणे आपल्या देशात एकमेव रवीन्द्रनाथ ठाकुरांनी शिक्षणात कलेला उपयुक्त स्थान दिलं होतं. विश्वविद्यालयातील  प्रचलित वर्तमान शिक्षण पद्धतीचा परिणाम म्हणून त्यांना अगदी पावलापावलावर अडचणींचा सामना करावा लागला.

विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमात  कला प्रशिक्षण समाविष्ट न केल्याने विद्यार्थ्यांना त्याचं काहीच महत्त्व वाटत नाही. मुलांना लहानपणी तर विविध कलांमध्ये रस असतो, पण  कॉलेजमध्ये एक दोन वर्षात कलेचा अभ्यासाशी काही संबंध नाही हे त्यांना समजते आणि  परिणामी त्यांची कलेची आवड कमी कमी होत जाऊन संपून जाते. या सर्व गोष्टींकडे सगळ्या विद्या आणि ज्ञान केंद्रांनी लक्ष देण्याची वेळ आता आली आहे.

साधी गोष्ट आहे, कलेच्या बाबतीत सुशिक्षित समाजाची आणि विश्वविद्यालयांची उदासीनता कमी झाली तर कला प्रसार होण्यास मदतच होईल. आणि परिणामी, आपल्या देशवासीयांची सौंदर्यशास्त्र आणि त्यांची निरीक्षणाची पात्रता वाढेल यात शंका नाही.

*मूळ लेख – हिंदी शैक्षणिक संदर्भ, १२८.* https://www.eklavya.in/magazine-activity/sandarbh-magazines/619-sandarbh-121-to-130/sandarbh-issue-128/3768-shiksha-main-kala-ka-sthan

§§§

---

लेखक - **नंदलाल बसु (१८८२-१९६६),** आधुनिक भारतीय कलेचे प्रवर्तकांपैकी एक, आधुनिकतावादी.

अनुवाद - **यशश्री पुणेकर**, शैक्षणिक संदर्भ गटात सहभागी.

इमेल - yashashreegpunekar@gmail.com

*सर्व चित्रे - **नंदलाल बसु.***

*(कळीचे शब्द: नंदलाल बसु, सौंदर्यदृष्टी, कलेचा अभ्यास, शाळेत कला शिक्षण, कला व अर्थार्जन)*